**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,**

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि भारत मौसम विभाग**

**ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsparbhani@gmail.com**

**बीड कृषी हवामान सल्ला** **मंगळवार, दिनांक – २४.११.२०२०**

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक २५ ते २९ नोव्हेंबर, २०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | २५/११ | २६/११ | २७/११ | २८/११ | २९/११ |
| पाऊस | ०.० | ०.० | ४.० | ०.० | ०.० |
| कमाल तापमान (अं.से.) | ३१.० | ३१.० | ३०.० | २९.० | २९.० |
| किमान तापमान (अं.से.) | १७.० | १९.० | १६.० | १८.० | १९.० |
| ढग स्थिती (आकाश) | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | अंशतः ढगाळ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ४९ | ५५ | ८३ | ७८ | ७५ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ३२ | ३० | ५३ | ५९ | ५६ |
| वा-याचा वेग (किमी / तास) | ९ | ११ | १८ | १६ | ९ |
| वा-याची दिशा | पूर्व | पूर्व | ईशान्य | पूर्व – ईशान्य | पूर्व |

| हवामानाचा इशारा | हवामान अंदाजानूसार पुढील पाच दिवसात आकाश अंशतः ढगाळ ते ढगाळ राहून दिनांक २७ नोव्हेंबर २०२० रोजी जिल्हयात तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता आहे. | |
|---|---|---|
| पिकांचे नाव | अवस्था | कृषि हवामान सल्ला |
| हरभरा | फांद्या लागणे अवस्था | हरभरा पिकात घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यवस्थापनासाठी ५ % (एनएसकेई) निंबोळी अर्क किंवा क्विनॉलफॉस २५ % इसी २० मीली किंवा इमामेक्टीन बेन्झोएट ५ % ४.५ ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| करडई | वाढीची अवस्था | करडई पिकात माव्याचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यवस्थापनासाठी डायमेथोट ३० % १३ मीली किंवा असिफेट ७५ % १० ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| ऊस | उगवण | लागवड केलेल्या ऊस पिकात आवश्यकतेनुसार पाणी व्यवस्थापन करावे. |
| हळद | कंद वाढीची अवस्था | हळद पिकात कंद माशीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यवस्थापनासाठी क्विनॉलफॉस २५ % २० मीली किंवा डायमेथोएट ३० % १० मीली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून आलटून पालटून फवारणी करावी व मातीने कंद झाकून घ्यावे. (हळद पिकावर केंद्रीय कीटकनाशक मंडळातर्फे लेबल क्लेम नसल्यामुळे विद्यापीठ शिफारशीत संशोधनाचे निष्कर्ष दिले आहेत). हळद पिकात पानावरील ठिपके या रोगाच्या व्यवस्थापनासाठी अॅझोक्सिस्ट्रोबीन १८.२ % + डायफेनकोनॅझोल ११.४ % एससी १० मीली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| संत्रा/मोसंबी | फळ वाढीची अवस्था | संत्रा/मोसंबी बागेत फळ शोषण करणाऱ्या पतंग चा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यवस्थापनासाठी बागेत प्रकाश सापळे लावावे. संत्रा/मोसंबी बागेत मृग बहार संत्रा/मोसंबी बागेत फळ गळ होत असल्याचे दिसून येत असल्यास त्याच्या व्यवस्थापनासाठी चिलेटेड झिंक ५ ग्राम प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| डाळिंब | काढणी अवस्था | काढणीस तयार असलेल्या डाळिंबची काढणी करून घ्यावी. |
| चिकू | वाढीची | चिकू बागेत आवश्यकतेनुसार व्यवस्थापन करावे. |

| | | |
|---|---|---|
| **फुल शेती** | **वाढीची** | फुल बागेत तण नियंत्रण करून आवश्यकतेनुसार पाणी व्यवस्थापन करावे. काढणीस आलेल्या फुलांची काढणी करून घ्यावे. |
| **भाजीपाला** | **वाढीची** | पुनर्लागवड केलेल्या भाजीपाला पिकात तण नियंत्रण करून आणि पाणी व्यवस्थापन करावे. काढणीस आलेल्या भाजीपाला पिकाची काढणी करून घ्यावे. |
| **चारा पिके** | **वाढीची** | चाऱ्यासाठी रब्बी ज्वारी पिकाची पेरणी करून १५ दिवस झाले असल्यास पाणी व्यवस्थापन करावे. |
| **पशुधन व्यवस्थापन** | -- | नवीन जन्मलेल्या गाय व म्हेस यांच्या वासरामध्ये विशेषतः म्हशीच्या नर वासरामध्ये टाक्सोकैरा व्हीटूलोरम या गोलकृमाची लागण होते. यासाठी जन्मलेल्या वासरास वयाच्या ७ व्या दिवशी वा त्यानंतर पायपटझीन या जंतनाशक औषधीची मात्रा देणे आवश्यक आहे. अन्यथा वासरामध्ये आवमीश्रीत दुगधरेणारी घट विष्टा टाकल्या जात व प्रसंगी मृत्यु ओढवतो. |

**सदर कृषी सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषी मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.**